# स्वातंत्र्यवीरांचे विचार पोचविण्यासाठी धडपड

## सत्तरीनंतरही शशिकांत गोखले यांचे प्रयत्न


शशिकांत गोखले

**पुणे, ता. ८ :** सावरकरांचे साहित्य, विचार आजच्या तरुण पिढीपर्यंत पोचावेत. तरुणांनी छोट्या- छोट्या गोष्टींतून नैराश्य न येऊ देता, सावरकरांच्या जीवनप्रवासातून प्रेरणा घेऊन आयुष्य घडवावे, यासाठी वयाच्या सत्तरीतही निवृत्त प्राध्यापक शशिकांत गोखले सावरकरांचे विचार लोकांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करत आहेत.

सावरकरांचे पुष्कळ साहित्य आज उपलब्ध आहे. पण या गतिमान युगात मोठी पुस्तके वाचणे लोकांना शक्य होत नाही. त्यामुळे सावरकरांचे विचार तरुणांबरोबरच लहान मुलांपर्यंत पोचावेत यासाठी गोखले यांनी सावरकरांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना विशद करणारी 'अष्टविनायकदर्शन' पुस्तिका लिहिली आहे. गोखले यांनी स्वतः खर्च करून पुस्तिकेच्या अडीचशे प्रती छापल्या व आपल्या मित्रांमध्ये, शाळांत वितरित केल्या. काही मित्रांनी विकत घेऊन इतरांना भेट दिल्या.

दहावी- बारावीच्या परीक्षेत कमी गुण मिळाले किंवा नापास झाल्याने नैराश्यापोटी किंवा भीतीने मुले आत्महत्या करतात. या आत्महत्या थांबाव्यात, त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी मुलांपुढे सावरकरांचा जीवनप्रवास मांडण्याचा प्रयत्न गोखले यांनी या पुस्तिकेतून केला आहे. अंदमानात कैदेत असताना सावरकरांना अत्यंत नैराश्य आले होते. परंतु त्यांनी त्यावर मात करत स्वातंत्र्याचा लढा चालूच ठेवला. कोणतीही अडचण, वाईट परिस्थितीने खचून न जाता त्याचा धैर्याने सामना करावा, हा संदेश या पुस्तिकेतून दिला आहे. भगूर, नाशिक, पुणे, इंडिया हाउस-लंडन, ब्रायटन समुद्र किनारा, मार्सेसिस बंदर-फ्रान्स, अंदमान सेल्युलर जेल, रत्नागिरी, सावरकर सदन-मुंबई या ठिकाणी घडलेल्या घटना, त्यांनी केलेले कार्य यांचीही माहिती या पुस्तिकेत दिली आहे. ही पुस्तिका वाचल्यानंतर सावरकरांचे साहित्य वाचण्याची इच्छा झाली, तर तीत त्यांच्या साहित्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. लवकरच मायविश्‍व या ई-बुक प्रकाशित करणाऱ्या कंपनीच्या साहायाने 'बुकगंगा डॉट कॉम' या संकेतस्थळावर अष्टविनायकदर्शन ही पुस्तिका वाचकांना वाचता येणार आहे.